अविनाश निकाळजे, अक्षय निकाळजे, गणेश गायकवाड, किरण साबळे, अप्पा साबळे, इंजि. अक्षय सिरसवाल अजय निकाळजे, अनिकेत थोरात, श्याम साळवे, किरण जगताप, अमोल धोत्रे, सागर सावंत, सतीष राजगुरू, यशवंत सदाफुले, शुभम शिंदे, राजू गायकवाड, यशोदीप गायकवाड, विकास मोरे, अंशुल निकाळजे, इंजि. अक्षय सिरसवाल, हर्षवर्धन निकाळजे, आदित्य गायकवाड व मयूर वांढरे आदी संविधानप्रेमी सुजाण नागरिक तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

## लक्ष्मीनारायण मंदिराची ६५ ... पान ४ वरून

कविता जाधव यांचा हा निर्णय केवळ प्रशासकीय आदेश नाही, तर भ्रष्ट साखळीला दिलेला ठोस संदेश आहे.

या आदेशामुळे देवस्थानांच्या नावाने जमिनी बळकावणाऱ्यांना आता चपराक बसण्याची शक्यता आहे. बीड जिल्ह्यातील देवस्थान संपत्ती वाचवण्यासाठी समाज, धर्मदाय विभाग यांनी एकत्र येऊन कारवाई केली नाही, तर अनेक पवित्र ठिकाणांच्या जमिनी पुढील काही वर्षांत इतिहासजमा होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**मंदिराच्या उत्पन्नावर डल्ला**

अनेक वर्षे अट्टल कुटुंब मंदिराच्या जमिनीवर शेती करत होते आणि त्या उत्पन्नावर स्वतःचा हक्क सांगत होते. देवस्थानच्या निधीचा दुरुपयोग आणि मंदिराच्या नावाने मिळणाऱ्या उत्पन्नाची हेराफेरी झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**बनावट फेरफार यातून देवस्थान जमीन बळकावली**

मौजे कोल्हेर व लुकामसला येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्टच्या नावे एकूण ११७एकर जमीन नोंद आहे. त्यापैकी मौजे कोल्हेर येथील गट क्रमांक ५१ मधील ६५ एकर जमीन राधेश्याम अट्टल यांनी महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या मिलीभगतीने स्वतःच्या नावावर करून घेतली.

---

शिक्का

स्वाक्षरीत/-
क.लिपीक

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहा.अधिक्षक
सह.दिवाणी न्यायालय क.स्तर अंबाजोगाई

---

## जाहिरनामा

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**मा.श्रीमती प्रियंका ज.लिगाडे, २ रे सह.दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबाजोगाई यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर- ५८२/२०२५**

**आबासाहेब देशमुख विरूद्ध निरंक**

अर्जदार - १) आबासाहेब पिता रावसाहेब देशमुख वय ४८ वर्षे, धंदा- शेती रा.पाटोदा (म.ता. अंबाजोगाई जि.बीड

Exh.11/C

विरूध्द
निरंक
गैरअर्जदार

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ ऑफ कलम (८) प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा मयत नामे रावसाहेब पिता बाबुराव देशमुख व मयत नामे इंदुबाई भ्र.रावसाहेब देशमुख, रा.पाटोदा (म.) ता. अंबाजोगाई जि.बीड यांचे दिनांक - १६/०३/२००४ व दिनांक - १९/०६/२०२४ रोजी निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी मे.कोर्टात सदरचे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. सदरहु अर्जदार हा मयताचा मुलगा या नात्याने एकमेव कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी ह्या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर न्यायालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यात येईल.

पूढील तारीख - १३/११/२०२५.

आज दिनांक- ०८/१०/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

शिक्का

स्वाक्षरीत/-
क.लिपीक

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहा.अधिक्षक
सह.दिवाणी न्यायालय क.स्तर अंबाजोगाई